# अमेरिकन अभिषेक

**मुकुंद टाकसाळे**

' हे बघा, आज लवकर घरी या. आपल्याला अभिषेकच्या स्वागत समारंभाला जायचं आहे.' ऑफिसला जाता जाता प्रिया म्हणाली.

' कोण अभिषेक?' मी त्रासून विचारलं.

' अहो, असं काय करताय? अभिषेक ठाऊक नाही का तुम्हाला?'

' नाही. आपल्या माहेरचे नातेवाईक त्रिखंडात ठाऊक असल्याच्या थाटात प्रिया नेहमी बोलत असते. पण मी ठामपणे ' नाही' म्हटलं.

' अहो अभिषेक म्हणजे ... प्रसाद आणि पूजा यांचा मुलगा ... निरंजनचा जावई...'

' त्यानं आज लग्न केलं का? '

' नाही हो. त्याला आता पाच वर्षाचा मुलगा आहे. सॉरी.'

' सॉरी कशाबद्दल? '

' सॉरी मुलाचं नाव आहे त्याच्या.'

' सॉरी हे मुलाचं नाव आहे? '

' म्हणजे सौरभचा तो अमेरिकन शॉर्ट फॉर्म आहे. तिकडं असली अवघड नावं उच्चारता येत नाहीत ना...बायकोला सुध्दा तो नंडी म्हणतो. नंदिनीचा शॉर्ट फॉम. '

' वा ! छान ! ती नंडी आणि हा नंडी बैल !' मी वैतागून म्हणालो, 'त्यांनी जर पाच वर्षापूर्वी लग्न केलं असेल...'

'पाच नाही, सात. लग्नानंतर दोन वर्षांनी सॉरी झाला.' प्रियानं त्वरीत तपशील दुरुस्त केला.'

'ठीक आहे. त्यांनी जर सात वर्षापूर्वी लग्न केल असेल तर मग आज त्याचा स्वागत समारंभ करायचं काय कारण आहे?'

'तुम्ही अगदी खेडवळासारखचं करता. अहो स्वागत समारंभ काही लग्नाचाच असतो असं नाही. तो पाच सहा वर्षांनी भारतात आलाय ना म्हणून त्याच्या स्वागतासाठी निरंजननं हा समारंभ आयोजित केला आहे.'

'पण निरंजन पाच वर्षांनी भारतात आला म्हणून आम्ही का हुरळून जायचं?'

'अहो निरंजन नाही. अभिषेक पाच वर्षांनी भारतात आलाय. अभिषेक हा निरंजनचा जावई.'

निरंजनचा जावई अमेरिकेतला? डोक्यात एकदम सिनेमातल्या प्रमाणे कडाकडा विजा चमकल्या. एका श्रावणातला तो अपमानास्पद प्रसंग माझ्या डोळयासमोर जसाच्या तसा उभा राहिला. म्हणजे मी एका श्रावण संध्याकाळी मक्याचं भाजलेलं कणीस खात होतो. मक्याच कणीस म्हणजे मला जीव की प्राण ! मी हात आणि तोंड काळं झाल तरी ते कणीस आनंदाने खात होतो. माझ हे दुसरं कणीस खाणं चालू होतं. एवढयात तिथे हा हरामखोर निरंजन प्रवेश करता झाला.

'काय खातोयस ? ओः स्वीट कॉर्न !'

आल्या आल्या उद्‌गारला. इतकं उद्‌गारुन तो गप्प बसता तर किती बरं होतं.

' अरे तू इथं एवढं मिटक्या मारत हे खातोयस, पण तुला माहित्येय का... अमेरिकेत मका डुकरांना खायला घालतात... म्हणजे माझा जावईच मला सांगत होता हे.'

'मग तुझ्या जावयाला तिकडं मकाच घालतात का खायला?' हे वाक्य माझ्या अगदी ओठावर आलं होतं. पण ते वाक्य मी अपमानाबरोबर आणि मक्याच्या दाण्याबरोबर गिळून टाकलं. वाटलं, हेच काळे हात (निरंजनच्या जावयाच्या नाही तर नाही, पण निदान) निरंजनाच्या थोबाडावर मारावेत आणि त्याचं तोंड काळं करावं. पण मी शांत राहिलो. तेंव्हापासून निरंजनचा जावई माझ्या मनात पक्का बसून गेला.

आता हाच जावई भारतात आला होता आणि त्याच्या स्वागतासाठी निरंजननं मोठा स्वागत समारंभ ठेवला होता.

'हे बघ, मी काही त्या जावयाच्या स्वागत समारंभाला येणार नाही. ' मी निक्षून सांगितलं.

'मला वाटलंच होतं. माझ्या माहेरचे बरेच नातेवाईक अमेरिकेत आहेत याची जळजळ वाटते तुम्हांला.'

'मला जळजळ वाटते ती माझ्या ॲसिडीटीमुळे. तेंव्हा माझ्या जळजळीला तुझे माहेरचे नातेवाईक जबाबदार आहेत असा कृपया गैरसमज करून घेऊ नकोस. देवघर फॅमिलीमुळे मला ॲसिडिटी, जळजळ असे किरकोळ रोग होणार नाहीत. हार्ट ॲटॅक येईल सिव्हियर, माहित्येय?' मी चिडचिडून म्हणालो.

'छान ! आता माझं माहेरचं आडनावसुध्दा विसरलात का? अहो देवघर नाही देवधर !'

'अच्छा देवधर होय? मला पूजा, निरंजन, प्रसाद, अभिषेक, उदबत्ती असल्या नावांमुळे आडनावसुद्धा देवघर असेल असं वाटलं होतं.'

'अहो, ती आधुनिक फॅशनची नावं आहेत. तुमच्याकडं म्हणजे नारायण, दत्तात्रेय, विष्णू, राम, लक्ष्मण... असली जुनाट नावं सगळयांची !'

'ही देवांची नावं आहेत. हे देव आहेत म्हणून पूजा, प्रसाद , निरंजन, अभिषेक हे सारं आहे. हे देवच नसते तर कशाची पूजा केली असती?'

'तुम्ही मला युक्तीवादाला थोडेच हार जाणार आहात?' काहीशा कौतुकल्या स्वरात प्रियाने शरणागती मान्य केली. 'संध्याकाळी लवकर घरी या म्हणजे झालं !' असं आदेशवजा वाक्यही जाता जाता तिने टाकलंच.

संध्याकाळी केवळ प्रियाच्या धाकानेच मी लवकर घरी आलो. प्रिया एकदम जीन्स आणि टी शर्ट घालून सज्ज झाली होती. क्षणभर मलाचं गोंधळल्यासारखं झालं. एखाद्या भलत्याच तरूण मुलीबरोबर आपण बाहेर पडतो आहोत असं वाटून मनात एकाच वेळी थरार आणि धाकधूक निर्माण झाली होती.

'अग, हे कायं?' मी न राहवून म्हटलंच.

'तिथे अमेरिकेतली मंडळी येणार. त्यांच्या तिकडं कॅज्युअल वेअरचीच फॅशन असते. शिवाय अभिषेकने ही जीन्स देऊनसुध्दा पाच वर्षं लोटली...'

'ते तर लक्षात येत आहेच. खरचं, पाच वर्षापूर्वी तू किती शेलाटी होतीस नं?' मी म्हटलं.

माझ्या शेऱ्याकडे दुर्लक्ष करून ती पुढं म्हणाली, 'पाच वर्षात एकदाही जीन्स घातली नाही तर अभिषेकला काय वाटेल?'

मी आहे तेच ऑफिसमधले कपडे अंगावर ठेवून चपला पायात चढवल्या. कुठतरी बॅलन्स व्हायला पाहिजे नं....

'हे काय? तुम्ही असेच येणार?'

'हो.' मी ठामपणे म्हणालो.

'आणि हातात कळकट पिशवी कशाला?' तिनं रागानं विचारलं.

'कोपऱ्यावरच्या अल्टर सेंटर वर पायजमा दुरुस्तीला टाकायचाय. खिसा फाटलाय त्याचा. शिवाय नाडीही गायब झाली आहे. एकदा दुरुस्त करून आणला की रात्री झोपताना घालता येईल.'

'पण हे काम नंतर नाही का करता येणार?'

'नाही. तुला ती इंग्रजी म्हण माहित्येय का? अ स्टिच इन टाइम....'

'पुरे पुरे. आता तुमच्या इंग्रजीचा मारा नको. आणि ती पिशवी तरी जरी बरी घ्या.'

तिनं कपाटातून एक झकास कॅरी बॅग बाहेर काढली. एरवी मला हवी असेल तेंव्हा इतकी पॉश पिशवी कधीच मिळत नाही. पण अशा सणा समारंभाला ही आपल्या पोतडीतून अशा चिजा बाहेर काढते. मला माझा मळका पायजमा त्या देखण्या पिशवीत कोंबताना लाज वाटत होती.

'तुझं आपलं काहीतरीच. इथं कोपऱ्यावर अल्टर सेंटर मध्ये ती पिशवी राहणार. ती थोडीच आपण बरोबर घेऊन जाणार आहेत?'

पण म्हणतात ना - मॅन प्रपोजेस ॲन्ड गॉड डिस्पोजेस. कोपऱ्यावरचं ते सुप्रसिध्द टपरीवजा दुकान बंद होतं. आणि त्यामुळं ती कॅरी बॅग आम्हाला आमच्याबरोबर कॅरी करावी लागली. प्रिया रिक्शात माझ्याकडं विजयी मुद्रेनं पाहात होती. तिच्या दूरदृष्टीचं नाही म्हटलं तरी मला कौतुकचं वाटलं.

आम्ही मंगलधाम कार्यालयात गेलो तर ही ऽ गर्दी ! जणू अभिषेकच दुसरं लग्नच ! दारातच निरंजन भेटला. जावयाच्या कर्तृत्वामुळे त्याच्या अंगावर किलो-दोन किलो मांस चढलं होतं. गडी कोटबीट घालून आला होता. पण कोट अंगाला अगदी तटतटला होता.

आम्ही अभिषेकच्या दिशेला एक नजर टाकली. त्याला स्टेजवर भेटण्यासाठी नातेवाइकांची अक्षरशः रांग लागलेली होती. आम्ही विचार केला - जाऊ सावकाश.

आणि दारातच निरंजनशी बोलत उभं राहिलो. निरंजन म्हणाला, 'हा आणि आमची नंडी म्हणजे नंदिनी येणार जेमतेम पंधरा दिवस. त्यात जर प्रत्येक नातेवाइकाच्या घरी जाऊन भेटायचं म्हटलं, तर वेळ पुरणारच नाही. आणि यू नो ... अमेरिकेत इतकी वर्षे घालवल्यावर टाइम मॅनेजमेंटची सवयच लागते. आतासुध्दा आम्ही नऊला बंद करून टाकणार समारंभ. नंतर काही नगरसेवक आमदार आणि उद्योगपती येणार आहेत. एनाराय येणाराय म्हटल्यावर यू नो...'

एवढयात एक छोटा मुलगा हातात मक्याचं भाजलेलं कणीस घेऊन हात आणि तोंड बरबटलेल्या अवस्थेत 'आजोबा', 'आजोबा' करत निरंजनला बिलगला. निरंजनची पॅंट खराब झाली. पण नातू, त्यातून जावयाचं पोर म्हटल्यावर करतो काय? एवढयात 'सॉरी' 'सॉरी' करत त्याच्या मागून पळत पळत नन्दिनी आली. तिनं नखशिखांत भारतीय पोशाख घातला होता. या साऱ्यांच्यात प्रिया तिच्या तटतटीत जिन्समुळे वेगळी दिसत होती.

'अमेरिकेत मका डुकरांनां घालतात असं अभिषेक म्हणाला होता ना?' मी न राहवून निरंजनला म्हणालो. तो गोरामोरा झाला.

'त्याला भाजलेली कणसं इतकी आवडतात ना की आम्ही त्याला तिकडंसुध्दा अशी कणसं भाजून देतो. फार हूड आहे. नो...नो...सॉरी... से सॉरी टू आजोबा... त्यांची पॅंट खराब झाली ना सगळी? असं वागतात का? हे अंकल अशाने तुला मॅड म्हणतील... तो ऐकणार नाही बघा...'

तिचा असा एकपात्री प्रयोग चालू असतानाच आम्ही स्टेजजवळच्या अभिषेकला भेटून लगेच कटावं असा विचार केला. अभिषेकच्या दर्शनाला जी रांग होती त्यात सामील झालो. आमचा नंबर आल्यावरती मी अभिषेकला शेकहँड केला. त्याच्या चेहेऱ्यावर अनोळखी भाव स्प्ष्ट दिसत होता. त्यानं मला ओळखलचं नव्हतं. प्रिया माझ्या मागे उभी होती. तिच्याकडं अजून त्याचं लक्ष जायचं होतं.

मी त्याच्या चेहेऱ्यावरला गोंधळलेला भाव एन्जोय करत होतो. म्हटलं आपण होऊन ओळख द्यायचीच नाही. बघू हा चोर काय करतो ते. पण अभिषेक अधिक हुशार निघाला.

त्यानं त्वरेने मी छातीपाशी घेतलेली कॅरी बॅग सहजपणे त्याच्या हातात घेतली. आणि तो म्हणाला, 'अंकल हे कशाला आणलतं? दरवेळी कहीतरी द्यायलाच पाहिजे का?... अंकल जेवूनच जा बरं काइ! नंडी आहेच तुमच्याकडं लक्ष द्यायला.'

मी नर्व्हस मुद्रेने बाजूला झालो. प्रिया पुढं आली. 'हाय आंटी ! यू आर लूकिंग सो क्यूट... मी तर ओळखलचं नाही तुला आणि एकटीच आलीस? अंकलना का नाही आणलंस बरोबर?...'

प्रियानं माझ्याकडं बोट दाखवलं. अभिषेक लगेच ओशाळून म्हणाला, 'ओह ! सॉरी मी ओळखलचं नाही, हे तुझे अंकल आहेत म्हणून...'

आम्ही खाली उतरून बुफेच्या टेबलापाशी आलो. ऑफिसमधून परस्पर आल्यानं भूक भरपूर लागली होती. पण आता जेवणं गोड लागणं शक्यच नव्हतं. अगोदर ती कॅरी बॅग हस्तगत करणं महत्वाचं होतं.

प्रिया तर माझ्यावर संतापलीच होती. 'बावळटासारखी अगदी छातीपाशी धरून कशाला उभे होतात? त्याला वाटलं असणार तुम्ही अहेरचं आणलात म्हणून.' दबल्या आवाजात प्रिया मला झापडत होती.

मी तोंडातला गुलाबजाम संपवला आणि तेवढाच संतापून पण दबलेल्या आवाजात उत्तरलो, 'तू लुडबूड कशाला केलीस? सगळा दोष तुझाच आहे. ती कळकट पिशवी असती माझ्याजवळ तर त्याला तो अहेर वाटला नसता. आता भोघ तू तुझ्या कर्माची फळं !'

आमचा हा सूखसंवाद चालू असताना अभिषेक खाली उतरून जातीनं दखल घेण्यासाठी आमच्यापाशी आला. शिवाय मघाशी मला ओळखल नाही, हा अपराधी भावही त्याच्या मनात असावा.

'अंकल सावकाश होऊ द्या. प्रिया आंटी आहेच आमची लक्ष द्यायला. प्रिया आंटी, आय लाइक योर गिफ्ट हं...'

त्यानं गिफ्ट उघडूनही बघितली नव्हती हे तर उघड आहे. पण अमेरिकन मॅनर्सचा एक भाग म्हणून तो आमच्या अहेराचं कौतुक करत होता. पण त्याच्या या अभिप्रायामुळं आमचा दोघांचाही घास घशात अडकला.

'आता तुम्ही कधी येताय आमच्याकडे? टुरिस्ट व्हिसा मिळायला हल्ली अडचण येत नाही.'

'हो हो...येऊ की....काय ग?'

'हो हो येऊ ना.'

'अहो नाही नाही ते लोक येऊन राहून जातात आमच्याकडं. परावा ती मराठी भावगीत गायिका आली होती. काय बरं तिच नाव... तिच्या कॅसेट बघ काढल्यात अलुलकरनं... छे बुवा ! नाही अठवत आता.'

'ती राहिली होती का तुमच्याकडं?' मी विचारलं.

'छे छे ! तिचा तबलजी का पेटीवाला कोणीतरी राहिला होता. सारखी तंबाखू खायचा आणि बेसीनमध्ये थुंकायचा आणि ड्रिंक्स तर अशी ढोसायचा नं... अमेरिकेत कसं वागायचं याचं एक ट्रेनिंग स्कूलच उघडलं पाहिजे पुण्यात... अहो, प्रॉपर टॉयलेट ट्रेनिंगसुध्दा नसतं आपल्या मंडळींना.'

'आम्ही जेंव्हा तुमच्याकडे येऊ तेव्हा प्रॉपर टॉयलेट ट्रेनिंग घेऊनच येऊ...' मी थोडा रागानंच हे म्हणालो.

अभिषेकची इथल्या लोकांबद्दलची तुच्छता त्याच्या शब्दाशब्दांत जाणवत होती. मला त्यामुळे संताप अनावर होऊ लागला होता. 'तुम्हाला गंमत सांगतो अंकल... हे जे गाणं बजावणं करणारे, नकला करणारे आमच्याकडे येतात ना... सिम्प्ली हॉरीबल. भारतात फोन करून तासन तास बोलत बसतात. बील आमच्या बोकांडी... आणि येण्यापुर्वी अमेरिकेचा नकाशासुध्दा नीट बघून येत नाहीत. आता आम्ही राहतो लॉस एंजिल्सला तर हे म्हणतात - न्यूयॉर्कला माझा क्लासमेट राहतो. त्याच्याकडे संडेला मला घेऊन चला. मग मी त्याला लॉस एंजिल्स आणि न्यूयॉर्क हे अंतर किती आहे ते समजावून देतो. पण सण्डेला यांच्या शॉपिंगसाठी गाडी काढावीच लागते...'.

तो भारतीयांच्या अशा चहाडया बऱ्याच वेळ करत बसला असता; परंतु एक छोटीशी दुर्घटना माझ्या हातून घडली आणि संपूर्ण परिस्थितीला एक वेगळंच वळण प्राप्त झालं.

त्याच्या अहंमान्य बोलण्यानं माझा प्लेट धरलेला हात थरथरू लागला आणि आख्खी प्लेटच अभिषेकच्या अंगावर पडली. पुलाव, फ्लॉवर बटाटयाचा रस्सा, गुलाबजामची वाटी, वालाची उसळ, चटणी या साऱ्या पदार्थांचा अभिषेकवर अभिषेक झाला. रंगीबेरंगी पदार्थांची अभिषेकच्या टायपासून ते पॅन्टपर्यंत उधळण झाली. माझ्या सुप्त मनात 'मका डुकराला खायला घालतात' हे अपमानास्पद वाक्यही घर करून राहिलं असावं. त्यामुळेही माझ्या हातून नकळत हे कृत्य घडल असेलं. सांगता येत नाही. माणसाचं मन मोठ विचित्र असतं.

'ओह ! शीट !'

'डॅम्न !'

'बुलशीट !'

इंग्रजी भाषेतली शिवीवजा सारी उद्‌गारवाचकं अभिषेकच्या जिभेवर नाचत होती. अभिषेकला भारतीय हिसका दाखवायला अमेरिकेला जायची जरुर उरली नव्हती. काय करायचं ते न सुचून अभिषेक जागच्या जागीच थयथय नाचत होता. मी जोरजोरात 'सॉरी' 'सॉरी' म्हणायला लागलो. परिणामी 'सॉरी' हा पंचवर्षीय बाळ धावत आला. त्याच्या पाठोपाठ 'नण्डी' आली आणि पाठोपाठ निरंजनही. आता आमदार, उद्योगपती यायची वेळ जवळ येत असतानाच इथे अभिषेकचे कपडे खराब झाले होते.

हे कृष्णकृत्य माझेच असणार या खात्रीने निरंजन माझ्याकडे खाऊ की गिळू या नजरेनं बघत होता. इतक्या गडबडीत माझ्यापुढेही खाऊ का गिळू असा प्रश्न उभा राहिला होता. या परिस्थितीत दोन्ही विचार बाजूला ठेवून मी प्लेट बाजूला ठेवली. माझ्या खिशातला रुमाल काढून पाण्याच्या ग्लासात बुचकळला आणि त्या ओल्या रुमालानं अभिषेकच्या कपडयावरील खाद्यपदार्थांचे लालपिवळे डाग पुसू लागलो. परिणाम एवढाच झाला की ते डाग पाण्यामुळे होते त्यापेक्षा मोठे दिसू लागले.

' ओ ! डॅमीट ! मरू दे ते.' अभिषेक ओरडला. 'आधी घरी जाऊन माझे दुसरे कपडे आणा. आमदारसाहेब आणि इतरजण येण्यापूर्वी.'

निरंजन धावत धावतच बाहेर गेला आणि क्षणात सॅन्ट्रोत बसून मंगलधामाबाहेर पडला. इकडं अभिषेकला काय करावं ते सुचेना. त्यानं अस्वस्थ होऊन शर्ट काढला. पॅंटसुध्दा पांढरी असल्याने त्यावर रश्श्याचे आणि इतर डाग उठून दिसत होते. पण ती काढायची तर घालणार काय?

'नण्डी ... नण्डी... एखादी एक्स्ट्रा पॅंट नाही का?' अभिषेकनं चिडून विचारलं.

'सॉरी', नण्डी म्हणाली.

'अगं लक्ष कुठाय तुझं? मी तुला पॅंटबद्दल विचारतोय आणि तू सॉरीकडंच लक्ष देत्येयेस.'

'मी तुलाच सॉरी म्हटल अभिषेक. एक्स्ट्रा पॅंट नाही आहे. तुझ्या पॅंटवर, शर्टावर, टायवर सारे पदार्थ सांडतील म्हणून आम्ही एक्स्ट्रा कपडे घेऊन तयार राहायला पाहिजे होतं, अस का तुझं म्हणणं आहे?'

'हो राहायलाच पाहिजे होतं. तुझ्या माहेरची माणसं काय लायकीची आहेत हे तुला ठाऊक असायला पाहिजे. शीट !'

अभिषेकचा संताप समजण्याजोगा होता. परंतु दहा मिनीटात निरंजन कपडे घेऊन येणारच होता. मधला म्हात्रे पुल ओलांडला की निरंजनचा बंगला. जास्तीत जास्त पंधरा मिनिटं. पण निरंजनला त्या खरकटया पॅंटवर क्षणभरसुध्दा बसून राहाणं मरणःप्राय वाटत होतं.

मी म्हटलं, 'तात्पुरता पायजमा चालेल का?'

'चालेल. चालेल. क्किक. कुणी यायच्या आत मला ही पॅंट बदलली पाहिजे.'

आम्ही दिलेल्या अहेरच्या पिशवीतील कळकट पायजमा काढून मी त्याच्यासमोर धरला. पॅंट बदलण्याला उत्सुक असणाऱ्या अभिषेकने क्षणात पॅंट काढून तिथं साऱ्यांसमोरच (छोटसं कॅबरेवजा दृश्य दाखवून) मी दिलेला पायजमा चढवला.

'आधी ती पॅंट माझ्या डोळयासमोरून दूर न्या.' पायजमा चढवता चढवताच तो ओरडला.

त्याचा नूर बघून नण्डीने क्षणात ती पॅंट घटनास्थळापासून दूर नेली. इकडं पायजमा अंगात चढवल्यावर आपण काय घातलय त्याच भान अभिषेकला आलं. बिननाडीचा तो पायजमा एका हातानं आवळून धरून तो जोर जोरात ओरडू लागला, 'नाडी... नाडी ...नण्डी... नण्डी...नाडी नाडी.'

आता अभिषेक ऐन स्वागतसमारंभात बिननाडीचा पायजमा घालेल आणि त्याला नाडीची जरूर भासेल, याची कोणाला कल्पना असणार? नाडी शोधण्यासाठी सारे सैरावैरा धावू लागले. बाहेरच्या दुकानातून नाडी विकतच आणावी म्हणून एकदोघं बाहेरही धावत गेले.

एवढयात आमदार झांबरे, त्यांच्या सुविद्य पत्नी आणि नगरसेवकांचा गोतावळा एकदम झुंडीनंच तिथं आला. एका हातानं पायजमा गच्च पकडूनच अभिषेकनं साऱ्यांशी हस्तांदोलन केलं. हस्तांदोलन केल की त्याच हातानं तो गुच्छ स्वीकारायचा. तो बाजूला ठेवायचा. मग पुढच्याशी हस्तांदोलन. असा अभिषेकचा 'एक हाती' कारभार चाललेला होता.

'वंडरफुल ! तुमची ही कॅज्युअल स्टाइल मला आवडली. तिकडं लोक बनियान आणि हाप्प्यांट घालून हिंडतात हे ऐकलं होतं. आज प्रत्यक्ष दर्शनच झालं. हाप्प्यांटऐवजी पायजमा हे कॉम्बीनेशन मात्र लाजबाब आहे.' आमदार झांबरे प्रफुल्लित मुद्रेने म्हणाले.

'तसं नाही... नाडीचा पायजमाच मिळाला नाही ऐन वेळी ... म्हणून...' अभिषेक नर्व्हसपणे पुटपुटला.

'आश्चर्य आहे... भारत या सुवर्ण

महोत्सवी वर्षात स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करतो आहे. तुम्हाला इथं खर तर नाडीचा पायजमा मिळायला अडचण पडायचं काही कारणचं नव्हतं. म्हणजे स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवालाच संपूर्ण भारतीय बनावटीचा नाडीचा पायजमा घातल्याचं आजही मला जसच्या तसं आठवत आहे. मोठा मंतरलेला काळ होता तो...'

'हो हो...हॅ हॅ हॅ...बरोबर आहे.' अभिषेकला बोलणं सुचत नव्हतं. गंजीफ्रॉक आणि आवळून धरलेल्या पायजम्यामुळं तो कमालीचा अस्वस्थ झाला होता.

'या पायजम्यावरून एक गंमत आठवली. बेचाळीसच्या वेळी आम्ही पायजम्यातून बॉंब बांधून नेले होते. तुम्हाला सांगतो, त्यावेळी मी भूमिगत होतो...'

एवढयात नण्डी एक सुतळी घेऊन आली. म्हणाली, 'ही कंपाउंडवर सापडली. ही चालेल का?'

'चालेल. चालेल. तुझे बाबा येईपर्य ंतचाच प्रश्न आहे.'

नण्डी पिनेने अंगावरच्या पायजम्यात सुतळी घालू लागल्यावर मात्र अभिषेक चिडला. तिच्या हातून सुतळी ओढून तो म्हणाला, 'इतक्या लोकांसमोर हे कशाला? वरूनच बांधतो.' त्यानं सर्वांसमोर पायजम्यावरूनच सुतळी आवळली. त्यामुळे पायजमा वर खेचला जाऊन अभिषेकचा अगदी 'चिच्या' झाला. पण दीर्घ काळ गुंतलेला हात मोकळा झाल्याचा आनंद काही औरच होता.

'तुम्हाला सांगतो, स्वातंत्र्याच्या संग्रामाची धुंदी काही औरच होती. गर्जा जयजयकार क्रांतीचा. वा वा ! क्या बात है !' आमदार आता भूतकाळात रमून गेले होते.

'तुम्हाला सांगतो', आमदारांनी पुढची थाप सुरू केली.

'घरून कपडे घेऊन सासरा आला की ते घालून धंद्याची बोलणी करू' असा विचार अभिषेकनं मनाशी केला होता.

पंधरा मिनिटं झाली, वीस झाली, तीस झाली. आमदार आणि मंडळींचं खाऊन झाले तरी सासरा घरून कपडे घेऊन आलाच नाही. भारतात येऊन स्वतःचा उद्योग सुरू करण्यासंदर्भात अभिषेकला आमदारांशी बोलायचं होतं.
अखेर आमदार जाण्यासाठी चुळबुळ करू लागले. नाइलाजाने अभिषेक पायजमा - लेंग्यावरच धंद्याची बोलणी करू लागला. एनारायची इमेज आपल्याएवढी कुणीच खराब केली नसेल या विचाराने तो अधिकाधिक नर्व्हस होत होता. तशात त्याचा बनियन शुभ्र पांढरा आणि पायजमा मात्र आतल्या आचाऱ्याचा पळवून आणल्यासारखा कळकट - असला प्रकार होता. नर्व्हस अभिषेकला आपलं बोलणं नीटपणे मांडताही आलं नाही.

आमदार आणि मंडळी मंगलधामच्या बाहेर पडली मात्र आणि हातात कपडयांचा गठ्ठा घेऊन निरंजन धावत धावत आला.

'काय करणार ? म्हात्रे पुलावर ट्रॅफिक जॅम... तिथं तासभर अडकलो.' अपराधी स्वरात निरंजनं खुलासा केला.

'आता काय करायचेत कपडे? आता कोण उरलय इथं? साऱ्यांसमोर व्हायची ती शोभा झालीच...' असं म्हणत अभिषेकनं कपडे चढवले. खाली पायाशी 'ळ' करून पडलेला पायजमा त्यानं पायानंच वर उडवला. मी पटकन कॅच घेऊन घाईघाईने तो पायजमा त्या पॉश कॅरी बॅगेत कोंबला आणि निरंजनपाशी जाऊन आम्ही दोघांनी त्याचा निरोप घेतला.

'निघतो आता.' मी म्हणालो.

'निघा... आणि अभिषेकचा निरोप नका घेऊ. त्याचा मूड आज खराब आहे.' निरंजन

तुटकपणे म्हणाला.

एवढयात किचनमधून एक रश्शाचे भांडे घेऊन अभिषेक माझ्या दिशेनं चाल करून येताना दिसला. त्याच्या तोंडून इंग्रजी शिव्यांचा अखंड अभिषेक चालु होता. मी पुढचा संभाव्य धोका लक्षात घेऊन प्रियाचा हात धरून मंगलधामच्या बाहेर धूम ठोकली.

'माझा सगळा प्लॅन या गाढवानं डिस्टर्ब केला. त्या आमदारासमोर मला लाज आणली.' असं जोरजोरात ओरडत तो आम्हा दोघांच्या पाठीमागं धावत आला.

वाटेत तो कुणाल थडकावा?

साक्षात आमदार झांबऱ्यानांच !

'अहो माझी छत्री विसरली म्हणून परत आलो...' असा खुलासा करेपर्यंत आमदारांच्या अंगावर रश्श्याचं पातेलं उपड झालं होतं. आमदारांच्या डोक्यावर भांडं आदळल्यानं त्यांच्या कपाळाला टेंगूळही आलं होतं. पुढचं नाटय पाहायला आम्ही तिथे थांबलोच नाही.

आम्ही रिक्शाने घरी परतत असताना प्रिया आतून अगदी धुमसत होती. तिची इमेज तिच्या माहेरच्या माणसांसमोर तिच्या नवऱ्यानं अगदी धुळीस मिळवलेली होती.

'पुढच्या खेपेला माझ्या माहेरचं कुणी परदेशातुन आलं तर तुम्हाला मी बरोबरसुध्दा नेणार नाही.' प्रिया धुसफुसली.

'आणि नेणारच असशील तर आपण कायम एखादा जुना पायजमा बरोबर घेऊन जात जाऊ.' मी म्हणालो.

प्रिय वाचक,
मराठीतील दर्जेदार साहित्य आपल्यापर्यंत पोहोचवायचा आमचा हा प्रयत्न आहे. आपला अभिप्राय आम्हांस (marathikatha@gmail.com) जरुर कळवावा.

Copyright ©
सर्व हक्क लेखकाकडे स्वाधीन. या कथेची soft copy आपण वापरु शकता. परंतु अन्य उपयोगासाठी लेखकाची परवानगी आवश्यक आहे.
Document no m0400130005